# YASHODA GIRLS'
# ARTS AND COMMERCE COLLEGE
## SNEH NAGAR, NAGPUR

## Key Indicator 3.2- Innovation Ecosystem

*3.2.2. Number of workshops/seminars/conferences including on Research Methodology, Intellectual Property Rights (IPR) and entrepreneurship conducted during the last five years*

## Seminar- 2021-2022

Supporting Documents- 11

## National Webinar on Ambedkari Kaviyitrichya Kavita (Poems by Ambedkari Poetess)

## Date: 15-07-2021

**National Webinar on Ambedkari Kaviyitrichya Kavita**

**Brochure of the Webinar**

पुरुषोत्तम खापर्डे हेल्थ अॅण्ड एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित

# यशोदा गर्ल्स आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज

स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर-१५

मराठी विभागाद्वारे आयोजित

## एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार

# आंबेडकरवादी कवयित्रींची कविता

दिनांक :- १५ जुलै २०२१ गुरुवार
सकाळी :- १०.०० वाजता

### महाविद्यालयाविषयी :-

पुरुषोत्तम खापर्डे हेल्थ अॅण्ड एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित यशोदा गर्ल्स आर्ट्स अॅण्ड कामर्स कॉलेज, स्नेहनगर , नागपूर येथे १९९२ साली स्थापन झाले. स्थापनेपासून महाविद्यालयाने यशाच्या अनेक पायऱ्या यशस्वीतेने काबीज करून शिखर गाठले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठा द्वारा संलग्नित या महाविद्यालयामध्ये कला व वाणिज्य या विषयाचे पदवी अभ्यासक्रम चालविले जातात. कनिष्ठ महाविद्यालयासह पदवी स्तरावरील अध्यापन केले जाते.

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषदेतर्फे महाविद्यालयाला २०१७ मध्ये 'ब ++' दर्जा प्राप्त झाला आहे. ही महाविद्यालयासाठी अतिशय अभिमानाची बाब आहे. महाविद्यालयात नागपूर विद्यापीठाशी संचालित आजीवन अध्ययन विस्तार विभाग यांचे उपक्रम व प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविले जातात. राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा या उपक्रमांमध्येही महाविद्यालय अग्रेसर आहे.

### विषयासंबंधी :-

मराठी साहित्यातील कवयित्रींना कवितेच्या क्षेत्रात प्रथमतः प्रेरणा देणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वैचारिक ऊर्जेवरच स्त्री जीवनाच्या प्रकाशयात्रेला सुरुवात झाली. त्याची प्रेरणा घेऊन आंबेडकरवादी कवयित्रीच्या कविता सुरुवातीला लिहिल्या जाऊ लागल्या. १९६० नंतर आंबेडकरवादी साहित्यात बुद्ध-फुले-आंबेडकर ह्यांच्या प्रेरणा प्रामुख्याने काव्य स्वरूपात प्रकट होऊ लागल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिकतेचे, विज्ञानवादी दृष्टीकोनाचे आणि मानवतावादाचे पर्व सुरू होऊन आंबेडकरवादी साहित्यात कवी आणि कवयित्रींच्या कवितांतून वेदना, नकार आणि विद्रोह प्रकट होऊ लागला. आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यातून समाजपरिवर्तन, समताधिष्ठित नवसमाज ही आशावादी भूमिका प्रकट होऊ लागली होती. दया, सहानुभूती आणि माणुसकी ही खऱ्या अर्थाने धर्माची मूलतत्त्वे असताना देखील इथला माणूस ही तत्त्वे राबवीत नाही अशाप्रकारची जाणीव मांडली गेलेली आहे.आंबेडकरवादी कवयित्रींने आपल्या काव्यातून प्रकर्षाने आजूबाजूच्या चळवळीविषयी सर्वोतोपरी संघर्ष करू पाहणाऱ्याविषयी आणि शासनव्यवस्थेविषयी विद्रोही भूमिका मांडलेली आहे. आंबेडकरवादी कवयित्रीचे काव्यसंग्रह विपुल प्रमाणात नसले तरी ते काव्यसंग्रह प्रभावी आहेत. आंबेडकरवादी कवयित्रींच्या पहिल्या पिढीतील सुगंधा शेंडे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, कुमूद पावडे, लीला पाटील, लीला भेले सुरेखा भगत, मीना गजभिये, आशालता कांबळे या प्रमुख कवयित्री आहेत.या कवयित्रींचा वारसा पुढे नेत उषा भालेराव, आशा थोरात, उल्हासिनी कांबळे, विमल गाडेकर, सरिता जांभुळे, संध्या रंगारी, प्रज्ञा लोखंडे, प्रतिभा अहिरे, उषा अंभोरे, रजनी तिलक, समाकुमारी पांचाल, कौसल बैंसत्री, सुशीला टाकभौरे, ई. कवियीत्रींच्या कवितेने मराठी कवितेत नवे मानदंड निर्माण केले आहे. धम्मज्योती शेगोकर, उषा हिंगोणेकर, अपर्णा लांजेवार, नेहा गोडघाटे, मीरा शिंदे, संगिता बनकर, चंद्रप्रभा निकम, मालती इंगळे, धम्ममित्रा लोटकर, सुजाता बोधी, अहिल्या रंगारी, लक्ष्मी गवई, केशर मेश्राम, उषा बलकुंडे, गिपला गिमेकर, भारती सिरसाठ, कुंदा गायकवाड, प्रियंका नकाशे, शीला घरडे, अर्चना वैद्य, नंदा तायवाडे, निशा शेंडे, शर्मिष्ठा भगत, निर्मला लोंढे, माया वासनिक, ज्योत्स्ना चांदगुडे, निलांबरी शिर्के, सिसिलीया कार्व्हालो या सर्व आंबेडकरवादी कवयित्री नावारूपास आल्या आणि त्यांच्या कवितेने मराठी कवितेला नवे रूप प्रदान केले. आंबेडकरवादी कवयित्रीच्या काव्यामध्ये निरिश्वरवाद, अनात्मवाद, बुद्धीप्रामाण्यवाद, भौतिकवाद , मानवतावाद व स्त्रीवाद या आधुनिक जन-जीवन निर्माण करणाऱ्या विद्रोहाचे एकत्र रसायन झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याच्या आणि विचारांचा अविष्कार हाच आंबेडकरवादी कवयित्रीच्या काव्याचा ऊर्जास्त्रोत मानवा लागेल हीच खऱ्या अर्थाने एकविसाव्या शतकाच्या काव्याची खरी ओळख ठरेल. अशा आंबेडकरवादी कवयित्रींच्या जीवन जाणीवांचा वेध घेणे, त्यांच्या काव्याची प्रयोजने तपासणे, त्यांच्या कवितेतील विद्रोह, वेदना, नकार, यांचे आकलन करून घेणे,त्यांच्या कवितेतील स्त्रीवादाचे स्वरूप बघणे व त्यांच्या शैलींचा, प्रतिमा, प्रतीकाचे स्वरूप निश्चित करून या कवियीत्रींनी मराठी कवितेला कोणता नवा आयाम दिला यांची संगोपांग चर्चा घडविणे हेच या वेबिनारचे उद्दिष्ट आहे.

या ऑनलाईन वेबिनार मध्ये आपण आवर्जून सहभागी व्हावे ही विनंती.

**National Webinar on Ambedkari Kaviyitrichya Kavita**
**Brochure of the Webinar**

# कार्यक्रमाची रूपरेषा :

## उद्घाटन समारंभ

| | | | |
|---|---|---|---|
| १०.०० ते १०.१० | सुत्र संचालन | : | डॉ. विनिता हिंगे<br>सेवानिवृत्त प्राध्यापक,<br>यशोदा गर्ल्स आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर |
| १०.१० ते १०.२५ | प्रास्ताविक | : | डॉ. गोविंद नामदेव रावळेकर<br>सहायक प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख,<br>यशोदा गर्ल्स आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर |
| १०.२५ ते १०.४० | स्वागतपर भाषण | : | प्राचार्य, डॉ. धनराज शेटे,<br>यशोदा गर्ल्स आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर |
| १०.४० ते ११.०५ | उद्घाटकीय भाषण | : | डॉ. नम्रता बागडे,<br>मराठी विभाग, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद |
| ११.०५ ते ११.५० | अध्यक्षीय भाषण | : | प्रा. आशालता कांबळे<br>सुप्रसिद्ध साहित्यिक व कवयित्री, डोंबिवली, मुंबई |

## सत्र पहिले

| | | |
|---|---|---|
| ११.५० ते १२.३५ | विषयः आंबेडकरवादी कवयित्रीच्या कविता : | विशेष व्याख्यान : डॉ. प्रतिभा अहिरे,<br>सुप्रसिद्ध साहित्यिक व कवयित्री, औरंगाबाद |

## दुसरे सत्र

**सत्राध्यक्ष**

डॉ. शैलेंद्र लेंडे
विभाग प्रमुख,
डॉ. आंबेडकर विचारधारा:
रा.तु.म. विद्यापीठ, नागपूर

**निबंध वाचक :**

| | | |
|---|---|---|
| १२.३५ ते १२.५० | : | डॉ. अजय चिकाटे, सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख,<br>श्री पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड |
| १२.५० ते १.०५ | : | प्रा. प्रमोद नारायणे, सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,<br>यशवंत महाविद्यालय, वर्धा |
| १.०५ ते १.२० | : | डॉ. राष्ट्रपाल मेश्राम, सहायक प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख,<br>समाजकार्य महाविद्यालय, कामठी |
| १.२० ते २.०० | : | डॉ. शैलेंद्र लेंडे : सत्राध्यक्ष |
| आभार | : | डॉ. गोविंद नामदेव रावळेकर |

**National Webinar on Ambedkari Kaviyitrichya Kavita**
**Brochure of the Webinar**

सरंक्षक : **आदरणीय मा. सुश्री सरोजताई खापर्डे**
सचिव, पुरुषोत्तम खापर्डे हेल्थ ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नागपूर

आयोजक : **डॉ. धनराज शेटे**
प्राचार्य, यशोदा गर्ल्स आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

आयक्यूएसी समन्वयक : **डॉ. के. जी. मेश्राम**
सहयोगी प्राध्यापक,
यशोदा गर्ल्स आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

आयोजक सचिव : **डॉ. गोविंद नामदेव रावळेकर**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख,
यशोदा गर्ल्स आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

## सल्लागार समिती

**डॉ. शरयू तायवाडे**
प्राचार्य, तायवाडे महाविद्यालय, महादुला, कोराडी

**डॉ. प्रमोद मुनघाटे**
मराठी विभाग प्रमुख, स्नातकोत्तर मराठी विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. शैलेंद्र लेंडे**
विभाग प्रमुख, डॉ. आंबेडकर विचारधारा, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**या वेबिनारची संशोधन पुस्तिका (Soft Copy) मध्ये काढण्यात येणार आहे. तरी संशोधकांनी या पुस्तिकेसाठी आपले शोधनिबंध पाठवावे.**

## संशोधन निबंधासाठी विषय :

१. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांचे वेगळेपण
२. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची बलस्थाने
३. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा
४. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांचे क्रांतिविज्ञान
५. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितामधील आशय व अभिव्यक्ती
६. आंबेडकरवादी कवयित्रींचे मराठी साहित्यातील योगदान
७. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधील आंबेडकरदर्शन
८. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधील प्रतिमासृष्टी
९. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता : नव्या दिशा
१०. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता : वेदना व विद्रोह
११. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची वैशिष्टये
१२. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची भाषाशैली
१३. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील स्त्रीदर्शन
१४. आंबेडकरवादी कवयित्रींच्या स्त्रीवादाचे निराळेपण
१५. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता आणि परिवर्तन मूल्ये

**( वरील विषयाच्या व्यतीरिक्त संशोधकांना मुख्य विषयाला धरून शोधनिबंध लिहिता येईल. )**

**National Webinar on Ambedkari Kaviyitrichya Kavita**

Report of the event

# अहवाल

**मराठी विभागाद्वारे आभासी पद्धतीने 'आंबेडकरवादी कवयित्रींची कविता' या आभासी पद्धतीच्या एक दिवसीय राश्ट्रीय वेबिनारचे आयोजन**

**दि. 15 जुलै 2021**

**सत्र 2020– 2021**

य ोदा गर्ल्स ऑर्ट्स ॲण्ड कामर्स कॉलेज, स्नेहनगर, वर्धा रोड नागपूर येथे महाविद्यालयातील मराठी विभागाद्वारे 'आंबेडकरवादी कवयित्रींची कविता' या आभासी पद्धतीच्या एक दिवसीय राश्ट्रीय वेबिनारचे आयोजन दि. 15 जुलै 2021 रोजी सकाळी 10. 00 वाजता करण्यात आला. या वेबिनारच्या उद्घाटन स़त्रामध्ये उद्घाटक म्हणून उस्मानीया विद्यापीठ हैद्राबाद येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. नम्रता बागडे हया लाभल्या. या वेबिनारचे अध्यक्ष म्हणून पेंढारकर महाविद्यालय, डोंबिवली, मुबंई येथील मराठी विभागाच्या सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी डॉ. आ ालता कांबळे हया लाभल्या. या वेबिनारच्या पहिल्या स़त्राचे वि ोश अतिथी म्हणून ि ावाजी महाविद्यालय, कन्नड, औरंगाबाद येथील समाज ाास्त्र विभाग प्रमुख्य सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी डॉ. प्रतिभा अहिरे यांनी स्वीकारून आंबेडकरवादी कवयित्रीच्या कविता यावर बीज भाशण केले. त्याचप्रमाणे निबंध वाचन सत्र दुसरे याचे अध्यक्षपद रातुम नागपूर विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधाराचे विभाग प्रमुख डॉ. भौलेंद्र लेंडे यांनी स्वीकारले. या सत्रात निबंध वाचक म्हणून श्री पंढरीनाथ कला–वाणिज्य महाविद्यालय, नरखेड येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. अजय चिकाटे यांनी स्वीकारल. दुसरे निबंध वाचक य ावंत महाविद्यालय, वर्धा, येथील मराठी विभागाचे सहयोगी प्राध्यापक प्रमोद नारायणे यांनी स्वीकारले आणि तिसरे निबंध वाचक म्हणून समाजकार्य महाविद्यालय, कामठी येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. राश्ट्रपाल मेश्राम यांनी स्वीकारल. या वेबिनारची भूमिका व स्वागतपर भाशण आमच्या महाविद्यालयाचे माननिय प्राचार्य डॉ. धनराज भोटे यांनी केले. या वेबिनारचे संयोजक व महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. गोविंद नामदेव रावळेकर यांनी प्रास्ताविक व आभार मानले. या वेबिनारचे संचालन महाविद्यालयातील सेवानिवृत डॉ. विनिता हिंगे यांनी केले. या आभासी पद्धतीच्या वेबिनारला मान्यवर मराठी प्राध्यापक श्रोत्यांची उपस्थिती 47 इतकी होती. आणि या वेबिनारची यूपीए ई–जरनल काढून त्या मध्ये एकूण 31 प्राध्यापकांची लेख प्रकाि ात करण्यात आली. एकंदरीत आंबेडकरवादी कवयित्रींची कविता या आभासी पद्धतीच्या एक दिवसीय राश्ट्रीय वेबिनारला भरघोस प्रतिसाद मिळाला.

# National Webinar on Ambedkari Kaviyitrichya Kavita

Report of the event English Translation

Purushottam Khaparde Health & Education Society's
**Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur**
NAGPUR Estd. 1992
Accredited B++ by NAAC
▪ Recognized by Government of Maharashtra ▪ Affiliated to RTM Nagpur University, Nagpur
SNEH NAGAR, WARDHA ROAD, NAGPUR - 440 015. (M.S.) INDIA
▪ Tel. : 0712-2290637 ▪ Fax No.: 0712- 2290368 ▪ Website : www.yashodagirlscollege.edu.in ▪ Email : ygc.ngp@rediffmail.com

YGC No./ Report

Date 17/07/2021

## National Webinar on Poems of Ambedkarite Poetess

On 15th July 2021 Marathi department of Yashoda Girls' Arts and Commerce College organized a one day webinar on "Ambedkari Kavyatrichi Kavita" under the guidance of Principal Dr. Dhanraj Shete.

In the first session, Dr. Vinita Hinge conducted the program. Dr.Govind Rawlekar introduced all the dignitaries and described the aim and objectives of the program. Dr. Dhanraj Shete in his Inaugural speech threw light on strengths, inspiration and revolution of poems of Ambedkarite poetess. Dr. Namrata Bagde, Marathi department from Usmaniya University, Hydrabad and Prof. Ashalata Kambde, famous poetess from Dambiwali, Mumbai was invited for presenting their thoughts in the program. Dr. Pratibha Ahir, famous poetess from Aurangabad gave a special lecture on the topic of "Poems of Ambedkarite Poetess".

In the second session, Dr. Sailendra Lende, head of Dr.Ambedka thoughts department, Rashtrasant Tukadoji Mharaj Nagpur University, was the chief guest of the program. Dr. Ajay Chikale from Marathi Department of Pandrinath College, Narkhedwas present as an essay reader. Dr. Pramod Narayane from Yashwant College, Wardha and Dr. Rashtrapal Meshram from Marathi department of Samaj Karya Mahavidyalaya, Kamptee were also present and guided about the topic.

Dr.Govind Rawlekar thanked all the speakers, essay readers, poetess present at the event and thanked the advisory committee members Dr. Sharyu Taiwade from Taiwade College, Koradi, Dr.Pramod Munghate, Mrathi department RTMNU, and Dr. Shailendra Lende, Dr.Ambedkar thoughts department, RTMNU.

SEAL Yashoda Girls' Arts & Commerce College

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce Coll.
Sneh Nagar, Nagpur-15

## National Webinar on Ambedkari Kaviyitrichya Kavita

Program Schedule

*कार्यक्रमाची रूपरेषा *

10.00 ते 10.10 ***कार्यक्रमाचे संचालन*** :- **डाॅ. विनिता हिंगे**

प्राध्यापक, यशोदा गर्ल्स ऑटर्स ॲण्ड काॅमर्स काॅलेज, नागपूर

10.10 ते 10.25 ***प्रास्ताविक*** : - **डाॅ.गोविंद नामदेव रावळेकर**

सहायक प्राध्यापक , यशोदा गर्ल्स ऑटर्स ॲण्ड काॅमर्स काॅलेज, नागपूर

10.25 ते 10.40 ***आयोजनामागील भूमिका***

***व स्वागत*** : **प्राचार्य, डाॅ. धनराज शेटे**

यशोदा गर्ल्स ऑटर्स ॲण्ड काॅमर्स काॅलेज, नागपूर

10.40 ते 11.05 ***उदघाटनपर भाषण***:- **डाॅ. नम्रता बागडे**

मराठी विभाग प्रमुख , हैद्राबाद विश्वविद्यालय, हैद्राबाद

11.05 ते 11.50 ***कार्यक्रमाचे अध्यक्ष***

***अध्यक्षीय भाषण***: **डाॅ. आशालता कांबळे**

सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी, मुंबई

* **सत्र पहिले** *

11.50 ते 12.35 विषय : - ***आंबेडकरवादी कवयित्रीच्या कविता विशेष अतिथी***:- **डाॅ. प्रतिभा अहिरे**

सुप्रसिद्ध साहित्यक व कवी, औरंगाबाद

* **सत्र दुसरे** *

***अध्यक्ष***:- ***डाॅ. शैलेंद्र लेंडे***

विभाग प्रमुख, डाॅ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा, नागपूर

12.35 ते 1.20 ***निबंध वाचक***:- 12.35 ते 12.50 **डाॅ. अजय चिकाटे**

मराठी विभाग प्रमुख

सहयोगी प्राध्यापक, पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड

12.50 ते 1.05 **प्रा. प्रमोद नारायणे**

सहयोगी प्राध्यापक, यशवंत महाविद्यालय, वर्धा

1.05 ते 1.20 **डाॅ.राष्ट्रपाल मेश्राम**

सहायक प्राध्यापक, समाजकार्य महाविद्यालय, कामठी

1.20 ते 2.00 ***निबंध वाचन सत्र***

***अध्यक्षयाचे मार्गदर्शन***: **डाॅ. शैलेंद्र लेंडे**

2.00 ***आभार प्रदर्शन***: **डाॅ. गोविंद नामदेव रावळेकर**

## Photographs of the Webinar



# Photographs of the Webinar



# Photographs of the Webinar



## Photographs of the Webinar



## Photographs of the Webinar



## Photographs of the Webinar



# Photographs of the Webinar



## Photographs: Participants



**Photographs: Participants**



**Photographs: Participants**



# Photographs: Participants



## Photographs: Participants



## Certificates

पुरुषोत्तम खापर्डे हेल्थ अ‍ॅण्ड एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित

# यशोदा गर्ल्स आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,

## स्नेहनगर, नागपूर

## मराठी विभागाद्वारा आयोजित

एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार

# आंबेडकरवादी कवयित्रींची कविता

## प्रमाणपत्र

दि. १५ जुलै २०२१ ला आयोजित 'आंबेडकरवादी कवयित्रींची कविता' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार मध्ये सहभागी झाल्याबद्दल आपणास हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. गोविंद नामदेव रावळेकर
वेबिनार समन्वयक
मराठी विभागप्रमुख

डॉ. धनराज शेटे
प्राचार्य
यशोदा गर्ल्स आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर